<u>कलम ४(१)(b) (vi)</u>

## सदर कलमाअंतर्गत स्थापन करण्यात आलेली मंडळे, परिषद, समित्या व इतर संस्थांबाबतचे निवेदन पत्र.

विकास नियोजन खात्यासंबंधात वारसा इमारती, कापड गिरण्यांचा जागांचा विकास, 'कला-संगीत- संस्कृती. विषय' व उंच इमारती यांच्याशी संबंधित प्रस्तावांची छाननी करण्याकरिताव त्या संदर्भात प्रशासनाला सल्ला देण्याकरिता विविध समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

### १. मुंबई वारसा जतन समिती (एम.एच.सी.सी)

| | |
|---|---|
| **संलग्न संस्थेचे नाव आणि पत्ता** | मुंबई वारसा जतन समिती ( एम.एच.सी.सी )<br>सदर समितीचे कामकाज महापालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग मुंबई-४००००१ येथे स्थित प्रमुख अभियंता (विनि) यांच्या खात्यातील महापालिका उपवास्तुशास्त्रज्ञ(वि.नि.) यांच्या अखत्यारीतील वारसा जतन (हेरिटेज) विभागातून चालते . |
| **संलग्न संस्थेचा प्रकार** | **सल्लागार समिती** |
| **संलग्न संस्थेचा थोडक्यात परिचय** | महाराष्ट्र शासनातर्फे २१ एप्रिल १९९५ रोजी प्रकाशित अधिसुचना क्र.डिसीपी/१०९०/३१९७/आर.डी.पी./नवि-११ अन्वये विकास नियंत्रण नियमावली क्र.६७ ला मान्यता देण्यात आली. सदर नियमावली अंतर्गत सुचीबध्द वारसा इमारती, स्थळे, शिल्पे, बांधकामे आणि सांस्कृतिक आणि / किंवा वास्तुशास्त्रीय आणि / किंवा सौंदर्यात्मक आणि / किंवा ऐतिहासिक महत्त्व असलेली स्थळे (वारसा इमारती व प्रसिमा) यांचे संवंर्धन करण्यात येते.<br>राज्य शासनातर्फे दि.२५ एप्रिल १९९५ च्यया अधिसूचनेव्दारा वारसा जतन समितीची सर्वप्रथम स्थापना करण्यात आली. १९९१ च्या वि.नि.नि. क्र.६७ मध्ये स्पष्टीकरण देण्यात आलेल्या वारसा संवंर्धनाशी संबंधित विविध बाबी विषयी महापालिका आयुक्तांना सल्ला देण्याचे काम सदर समिती करते. |

| संलग्न संस्थेची भूमिका | **महानगरपालिका आयुक्तांची सल्लागार समिती.** |
|---|---|
| **संस्थेची रचना व सदस्य** | प्रत्येक वारसा जतन समितीचा कार्यकाळ ३ वर्षांकरिता आहे. शासन अधिसुचना क्र.टिपीबी४३१२/४३/प्र.क्र.१०/२०१२/नवि-११ दि. १७ ऑगस्ट २०१५ स्थापन करण्यात आलेल्या वारसा जतन समितीची रचना / सदस्य खालीलप्रमाणे आहेत.<br>१. डॉ.रमानाथ झा, निवृत्त प्रधान सचिव (भा.प्र.से.) – अध्यक्ष.<br>२. डॉ.अभिनंदन बागे, विभागप्रमुख, संरचना अभियांत्रिकी विभाग सरदार वल्लभभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई, सदस्य<br>३. डॉ. अभय बांबोले, विभागप्रमुख संरचना अभियांत्रिकी विभाग, वीरमाता जिजाबाई तांत्रिक संस्था ( व्ही. जे.टी.आय) , सदस्य<br>४. प्रा.राजीव मिश्रा, प्राचार्य सर ज.जी.वास्तु कला महाविद्यालय, सदस्य<br>५.डॉ.पी.पी.भावे, विभागप्रमुख / वरिष्ठ प्राध्यापक, पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, वीरमाता जिजाबाई तांत्रिक संस्था ( व्ही. जे.टी.आय) , सदस्य<br>६. डॉ.मंजिरी कामत, शहर इतिहासकार मुंबई विद्यापीठ, सदस्य<br>७. श्री. सब्यसाची मुखर्जी, संचालक , छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय ( प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ), सदस्य<br>८. श्रीम. अनिता खेराडे, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन, सदस्य<br>९. प्रमुख अभियंता यांच्यापेक्षा श्रेणीने कमी नसलेला मुंबई महानगरपालिकेचा अधिकारी ( मा.महापालिका आयुक्तांच्या सल्ल्यानुसार), सदस्य प्रमुख अभियंता (विकास नियोजन) हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.<br>१०. श्री.सुधाकर नान्गनुरे, निवृत्त संचालक – नगर नियोजन, सदस्य<br>११. श्रीम. किर्तिदा उनवाला, संवर्धन वास्तुशास्त्रज्ञ, स्वीकृत सदस्य |

| | |
|---|---|
| | सदर विषयात विशेष ज्ञान प्राप्त असणा-या एकंदर पाच स्वीकृत – सदस्यांची नेमणूक करण्याचे अधिकार समितीस आहेत. |
| **संस्थेचे प्रमुख** | महानगरपालिका आयुक्त |
| **मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा** | सदर समितीचे कामकाज महापालिका मुख्यालय ५ वा मजला, विस्तारीत, इमारत, महापालिका मार्ग, मुंबई-४०००१ येथे स्थित प्रमुख अभियंता(विनि) यांच्या खात्यातील महापालिका उपवास्तुशास्त्रज्ञ (वि.नि.) यांच्या अखत्यारितील हेरिटेज विभागातून चालते. |
| **बैठकींची वारंवारता** | सर्वसाधारणपणे तीन आठवडयातून एकदा |
| **सर्वसाधारण जनता बैठकीमध्ये भाग घेऊ शकते का?** | नाही. विषयाच्या संबंधित अर्जदार / वासतुशास्त्रज्ञ /अभियंते यांना सादरीकरणासाठी बोलाविले जाते. |
| **बैठकीचे इतिवृतांत तयार केले जातात का?** | होय. |

## २. हेरिटेज पुनर्विलोकन समिती (एच.आर. सी)

| | |
|---|---|
| **संलग्न संस्थेचे नाव आणि पत्ता** | हेरिटेज पुनर्विलोकन समिती (एच.आर.सी.)<br>सदर समितीचे कामकाज महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारीत इमारत, महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी. मुंबई-४००००१ येथे स्थित प्रमुख अभियंता (विनि) यांच्या खात्यातील महापालिका उपवास्तुशास्त्रज्ञ(वि.नि.) यांच्या अखत्यारीतील वारसा जतन (हेरिटेज) विभागातून चालते . |
| **संलग्न संस्थेचा प्रकार** | **सल्लागार समिती** |
| **संलग्न संस्थेचा थोडक्यात परिचय** | महानगरपालिका आयुक्त यांच्यातर्फे ३१ जुलै २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप हेरिटेज यादी (अस्तित्वात असलेल्या १९९५ साली प्रसिध्द केलेल्या हेरिटेज यादीचे पुर्नविलोकन आणि शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे करिता नविन हेरिटेज यादी) वर प्राप्त सुचना व हरकती विचारात घेवून त्याबाबत सुनावणी त्याबाबत सुनावणी करण्याकरिता महानगरपालिका आयुक्तांतर्फे नोव्हेंबर २०१३ मध्ये हेरिटेज पुनर्विलोकन समितीची नेमणूक करण्यात आली. श्री. दिनेश अफझूलपूरकर निवृत्त भा.प्र.से यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित हेरिटेज पुनर्विलोकन समितीमध्ये आपपल्या क्षेत्रामध्ये कुशल शहर इतिहासकार, वास्तुशास्त्रज्ञ, अभियंते, वास्तु संवर्धन शास्त्रज्ञ आणि शहर नियोजनकार यांचा समावेश आहे. |
| **संलग्न संस्थेची भूमिका** | महानगरपालिका आयुक्तांची सल्लागार समिती.<br>सदर पुनर्विलोकन समितीची कार्य करण्याची व्याप्ती / संदर्भ अटी खालीलप्रमाणे आहेत.<br>१. प्रसिध्द करण्यात आलेली संपूर्ण हेरिटेज यादी तपासणे व अभ्यास करणे.<br>२. सुचना व हरकती तपासणे व अभ्यास करणे.<br>३. आवश्यकतेनुसार सुचना व हरकती यांची सुनावणी घेणे. |

| | |
|---|---|
| | ४. सुचना व हरकती यांची त्यांचया गुणवत्तेनुसार मुल्यमापन करणे.<br>५. यादीचा अभ्यास करणे गरज असल्यास स्थळ पाहणी करणे, हेरिटेज यादीमधील त्या जागेचे सद्यस्थिती लक्षात घेणे आणि अहवाल तयार करणे / निष्कर्षांची यादी तयार करणे / अंतिम यादी बनविण्यासाठी शिफारस करणे.<br>६. वरील अहवाल / यादी मा. आयुक्तांच्या / महापालिकेच्या विचारार्थ आणि मान्यतेकरिता सादर करणे.<br>७. सदर विषयाच्या संबंधित मा. आयुक्त आणि संबंधित मा. आयुक्त आणि संबंधित विभागांच्या बैठकीत आवश्यकतेनुसार भाग घेणे.<br>८. आवश्यक तेथे नियमावली / मार्गदर्शकतत्वे बनविण्याकरिता व शिफारसी प्रभावीपणे लागू करण्याकरिता, मा. आयुक्तांना व्यापक सुचना देणे. |
| **संस्थेची रचना व सदस्य** | सदर हेरिटेज पुनर्विलोकन समितीची रचना / सदस्य खालीलप्रमाणे आहेत.<br>१. श्री.दिनेश के.अफजूलपुरकर, निवृत्त मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन आणि माजी अध्यक्ष , मुंबई वारसा जतन समिती (सन २००८ ते २०११ या कार्यकाळात) अध्यक्ष, हेरिटेज पुनर्विलोकन समिती आणि हेरिटेज पुनर्विलोकन समितीचे इतर सदस्य खालीलप्रमाणे.<br>२. श्री.जयंत वैद्य, वास्तुविशारद, मुंबई वारसा जतन समिती (सन २००८ ते २०११ या कार्यकाळात) माजी सदस्य, महाबळेश्वर हेरिटेज वारसा जतन समितीचे माजी सदस्य आणि पी.ई.अे.टी.अे. या संस्थेचे माजी अध्यक्ष.<br>३. प्रा. डॉ. वर्षा शिरगावकर, शहर इतिहासतज्ञ, प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, इतिहास व वारसा जतन यावर अनेक पुस्तके प्रकाशित, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व संग्रहालय |

| | |
|---|---|
| | विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य.<br>४. श्री.उदय वर्टी, वास्तुविशारद, गावठाण समितीचे माजी सदस्य, माजी विभागप्रमुख( पदव्युत्तर मुल्यांकन डिप्लोमा) व आय.ई.एस. वास्तुशास्त्रीय महाविद्यालयामधील माजी व्याख्याता, रिमेकिंग ऑफ मुंबई फेडरेशन ('सी' विभागाच्या पुनर्विकासाकरिता ) यांच्या पॅनलवरील सल्लागार वास्तुशास्त्रज्ञ.<br>५.श्री. महेश खानोलकर, वास्तुविशारद, मुंबई वारसा जतन समितीचे ( सन १९९९ ते २००५ या कार्यकाळात ) माजी सदस्य, रचना संसद वास्तुशास्त्रीय महाविद्यालयात अतिथी प्राध्यापक.<br>६. श्री. विलास रामचंद्र कोरान्ने, माजी उप प्रमुख अभियंता (रस्ते) मुंबई महानगरपालिका व आयुक्तांचे माजी विशेष कार्यकारी अधिकारी.<br>७. श्री. हर्षद भाटीया, अनेक खाजगी क्षेत्रातील व शासकीय संस्था यांचे शहर रचना, नियोजन, वास्तुशास्त्रीय संवर्धन याबाबतचे सल्लागार, शिक्षक, लेखक, इंडियन इंस्टिटयुंट ऑफ आर्किटेक्टस व वर्ल्ड सोसायटी ऑफ इकिस्टिक्स यांचे सदस्य.<br>८. श्रीम. किर्तिदा उनवाला, संवर्धन वास्तुविशारद, माथेरान हेरिटेज वारसा जतन समितीच्या माजी सदस्या, माथेरान अकोसिंन्सिटीव्ह समितीच्या उच्च स्तरीय देखरेख समितीवरील आमंत्रित सदस्य, सातारा प्रादेशिक रचना मंडळाची सदस्य, सर ज.जी.वास्तुशास्त्रीय महाविद्यालय व कमला रहेजा वास्तुशास्त्रीय महाविद्यालयांमध्ये भेट - व्याख्याता. ( शहर संवर्धन या विषयातील पदव्यत्तर अभ्यासक्रमाकरिता ) |

| | |
|---|---|
| **संस्थेचे प्रमुख** | अध्यक्ष, हेरिटेज पुनर्विलोकन समिती / महापालिका आयुक्त |
| **मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा** | सदर समितीचे कामकाज महानगरपालिका मुख्यालय ५ वा मजला, विस्तारीत, इमारत, महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी., मुंबई-४०००१ येथे स्थित प्रमुख अभियंता(विनि) यांच्या खात्यातील महानगरपालिका उपवास्तुशास्त्रज्ञ (वि.नि.) यांच्या अखत्यारितील हेरिटेज विभागातून चालते. |
| **बैठकींची वारंवारता** | गरज भासल्यास. |
| **सर्वसाधारण जनता बैठकीमध्ये भाग घेऊ शकते का?** | प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप हेरिटेज यादीवर प्राप्त सुचना / हरकती विचारात घेताना हेरिटेज पुनर्विलोकन समितीतर्फे अर्जदार / जनतेस सुनावणी दिली जाते. |
| **बैठकीचे इतिवृतांत तयार केले जातात का?** | चर्चा, सभा व जागा पाहणी यांच्या फे-यानंतर विभागवार संचित अहवाल हेरिटेज पुनर्विलोकन समितीतर्फे तयार केले जातात. |

### ३ उत्तुंग इमारती समिती (एच.आर.सी.)

| | |
|---|---|
| संलग्न संस्थेचे नाव आणि पत्ता | उत्तुंग इमारती समिती (एच.आर.सी.)- महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारीत इमारत, महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी. मुंबई-४००००१ येथे स्थित उप प्रमुख अभियंता (विनि)-२ यांच्या अखत्यारीत चालते. |
| संलग्न संस्थेचा प्रकार | सल्लागार समिती |
| संलग्न संस्थेचा थोडक्यात परिचय | महाराष्ट्र शासना मार्फत मंजूर केलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ मधील नियम १९ (२अ) नुसार अशा इमारती ज्यांची उंची १२० मी. पेक्षा जास्त आहे किंवा इमारतीचा स्लेन्डरनेस गुणोत्तर ९ किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास, उत्तुंग इमारत समिती मार्फत छाननी करुन् ना-हरकत परवानगी मिळणे अनिवार्य आहे. |
| संलग्न संस्थेची भूमिका | महानगरपालिका आयुक्तांची सल्लागार समिती |
| संस्थेची रचना व सदस्य | मा. आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका) यांनी क्र. एमजीसी/एफ/६६११ दि.१२.०१.२०२३ अन्वये नविन उत्तुंग समितीची स्थापना केली असून त्यांचे अध्यक्ष/ सदस्य खालीलप्रमाणे आहेत.<br>१) श्री. जॉनी जोसेप - (निवत्त भा.प्र.से.)-अध्यक्ष<br>२) श्री. दिनेश नाईक - सदस्य/ सचिव उप प्रमुख अभियंता (वि.नि.)<br>३) श्री. शशांक मेहदळे – संरचनात्मक अभियंता (नोंदणीकृत)<br>४) प्रा. आर.एस. जांगिड- आय.आय.टी. मुंबई मधील संरचनात्मक अध्यापक<br>५) श्री. दिपांकर चौधरी - आय.आय.टी. मुंबई मधील भुतांत्रिक अध्यापक<br>६) श्री. हिवराळे - प्रमुख अग्निशमन अधिकारी(बृहन्मुंबई महानगरपालिका) |
| संस्थेचे प्रमुख | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा | महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, सी.एस.टी. मुंबई-४००००१ येथे स्थित उप प्रमुख अभियंता (विनि)-२ यांच्या अखत्यारीत चालते. |
| बैठकींची वारंवारता | सर्व साधारण महिन्यातून एकदा स्थळभेट व एकदा सभा |
| सर्वसाधारण जनता बैठकीमध्ये भाग घेऊ शकते का? | नाही. विषयासंबंधित अर्जदार / वास्तुविशारद / अभियंते / सल्लागार यांना सादर करणासाठी बोलविले जाते. |
| बैठकीचे इतिवृतांत तयार केले जातात का? | होय. चर्चा, सभा व जागा पाहणी यांच्या फे-यानंतर विभागवार संचित अहवाल उत्तुंग इमारत समितीतर्फे तयार केले जातात. |

## ४. मुंबई कला, संगीत व संस्कृती आयोग ( कला आयोग ) Mumbai Commission for Music & Culture (MCAMC)

| | |
|---|---|
| **संलग्न संस्थेचे नाव आणि पत्ता** | मुंबई कला, संगीत व संस्कृती आयोग (MCAMC) सदर समितीचे कामकाज महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारीत इमारत, महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी. मुंबई-४००००१ येथे स्थित प्रमुख अभियंता (विनि) यांच्या खात्यातील महानगरपालिका उपवास्तुशास्त्रज्ञ ( वि.नि.) यांच्या अखत्यारीतील वारसा जतन (हेरिटेज) विभागातून चालते . |
| **संलग्न संस्थेचा प्रकार** | सल्लागार समिती |
| **संलग्न संस्थेचा थोडक्यात परिचय** | महाराष्ट्र शासनातर्फे दि.२८ फेब्रुवारी २०१८ रोजीचा प्रकाशित शासन निर्णय क्र. टीपीबी/४३१७/७७५/प्र.क्र.२९२/१७/नवि-११ अन्वये स्थापना करण्याचे निर्णय दिलेले आहेत. विकास आराखडा २०३४ मध्ये कला, संगीत आणि संस्कृतीकरिता आरक्षणे विकसित करण्याची तरतूद असल्याने MCAMC ची स्थापना दि.१७.०३.२०१८ रोजी केलेली आहे. |
| **संलग्न संस्थेची भुमिका** | महानगरपालिका आयुक्तांची सल्लागार समिती. |
| **संस्थेची रचना व सदस्य** | मुंबई कला, संगीत व संस्कृती आयोग(MCAMC) समितीचा कार्यकाळ ३ वर्षाकरिता आहे. महानगरपालिका अधिसुचना क्र.३५३७७/विनि/महा.उपवास्तु दि.१५ मार्च२०१८ नुसार समितीची रचना / सदस्य खालीलप्रमाणे आहेत.<br>१. डॉ.रमानाथ झा, निवृत्त प्रधान सचिव (भा.प्र.से.) – अध्यक्ष.<br>२. श्री.राजीव मिश्रा, कला संचालक (महाराष्ट्र शासन) – सभासद<br>३. श्री.अरझान खंबाटा- शिल्पकला आणि वास्तुविशारद – सभासद<br>४. श्री.रतन बॉटलीबॉय- वास्तुविशारद आणि अर्बन डिझायनर – सभासद |

| | |
|---|---|
| | ५. श्री.संजीव खांडेकर-कला तज्ञ आणि लेखक – सभासद<br>६. डॉ अनिता राणे-कोठारे- इतिहासतज्ञ – सभासद<br>७. श्रीम.आरती अंकलीकर-टीकेकर – संगीतविशारद – सभासद<br>८. श्री.चंद्रकांत कुलकर्णी – मराठी रंगमंच कलाकार दिग्दर्शक आणि लेखक – सभासद<br>९.बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कर्मचारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी नियुक्त केलेल्या संचालक / Member Secretary मार्फत सदर आयोगाचे दैनंदिन कामकाज चालविण्यात येईल. कुठल्याही विशिष्ट चर्चेकरिता आणि सल्ल्याकरीता अध्यक्ष कला विषयांस समर्पित इतर व्यवसायिकाला आयोगाच्या बैठकीसाठी आमंत्रित करु शकतात. |
| **संस्थेचे प्रमुख** | महानगरपालिका आयुक्त |
| **मुख्य कार्यालयाचा पत्ता व शाखा** | सदर समितीचे कामकाज महानगरपालिका मुख्यालय ५ वा मजला, विस्तारीत, इमारत, महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी., मुंबई-४०००१ येथे स्थित प्रमुख अभियंता (विनि) यांच्या खात्यातील महानगरपालिका उपवास्तुशास्त्रज्ञ (वि.नि.) यांच्या अखत्यारितील हेरिटेज विभागातून चालते. |
| **बैठकींची वारंवारता** | सर्वसाधारणपणे महिन्यातून एकदा. |
| **सर्वसाधारण जनता बैठकीमध्ये भाग घेऊ शकते का?** | नाही. विषयाच्या संबंधित अर्जदार / कलाकार यांना सादरीकरणासाठी व चर्चसाठी बोलाविले जाते. |
| **बैठकीचे इतिवृतांत तयार केले जातात का?** | होय. |